**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करिता सुधारीत मार्गदर्शक सूचना -E-Tendering चा वापर करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र-ग्रापाधो.११११/प्र.क्र.१८५/पापु-०७**
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२ ,दि. २९ फेब्रूवारी, २०१२

**वाचा**-१)शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७ .दि.१७ मार्च,२०१०
२) शासन निर्णय,ग्रामविकास व जलसंधारण विभाग,क्र.संकिर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७,दि.१९ ऑक्टोबर,२०११

**प्रस्तावना**- संदर्भाधिन शासन निर्णयातील परिच्छेद ३.१ मध्ये रु.५० लाख पर्यंत किंमतीच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी ग्रामपंचायत /ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या करतील व योजना पुर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दरुस्ती करतील.रु.५० लाख ते रु.५ कोटी किंमतीपर्यंतच्या स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी ही ग्रामपंचायत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या करतील.या योजनांची अंमलबजावणी करताना संबंधित ग्रामपंचायत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद लेखा संहितेमध्ये विहित केल्याप्रमाणे निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा,अशी तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीमुळे रु.५० लाखा पर्यंतच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी देखील ग्रामपंचायत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने निविदा कार्यपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत स्थानिक अधिकारी तसेच ग्रामस्थ यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.तो दुर करण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन परिपत्रक-**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथिल दि. १९ ऑक्टोबर,२०११ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकामे व साहित्य पुरवठ्याची कामे e-Tendering प्रक्रियेतून करण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.सदर शासन निर्णयातील परिच्छेद ०१(अ)(२) अनुसार ग्राम पंचायतींनी रु.१ लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या वस्तूंची /साहित्यांची खरेदी व परिच्छेद ०१(ब)(२) अनुसार रु.५ लक्ष व त्यापेक्षा अधिक मुल्य किंमतीच्या कामांचे वाटप e-Tendering प्रक्रियेद्वारेच करणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करताना या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. कार्यकारी अभियंता ,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद(सर्व) यांनी या सुचना सर्व ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०२२९११३१३९२३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र.अं.खडसे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

29/2/2012

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त,

सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई

संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,

संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा

मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई

सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सर्व प्रादेशिक उपसंचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,

सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष

सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)

सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा

पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने

निवड नस्ती,पापु-०७